पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

दिनांक: १३/०४/२०२०

## कोरोना विरोधात गडचिरोली जिल्हावासियांचा आजवरचा लढा यशस्वी, यापुढेही नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे

**- मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे**

'कोविड-१९' साथीच्या रोगाच्या अनुषंगाने जिल्हाभरातील नागरिकांना गडचिरोली पोलीस प्रशासनातर्फे आवाहन करण्यात येते की, केवळ अत्यावश्यक सेवांसाठीच नागरिकांना घराबाहेर पडावे. विनाकारण कोणत्याही नागरिकांनी घराबाहेर पडू नये त्याचबरोबर ज्यांना प्रवास करणे अगदी गरजेचे आहे. अशा नागरिकांना केवळ पोलीस दलाकडूनच पास उपलब्ध करुन देण्यात येणार असून, यासाठी नागरिकांनी https://covid19.mhpolice.in/ वेबसाईटवर जावून आवश्यक ती माहिती भरणे आवश्यक असणार आहे. जे शासकीय नोकरदार सुट्टीनिमित्ताने गडचिरोली मुख्यालय सोडून बाहेर जातील अशा शासकीय नोकरदारांना गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश दिला जाणार नाही.

जिल्हाभरातील बँकांनी नागरिकांची गर्दी होवू न देता 'सोशल डिस्टन्सिंग' राखूनच बँकेचे व्यवहार करावेत. याबाबीची संपुर्ण जबाबदारी बँक प्रशासनावर राहील. त्याचबरोबर अत्यावश्यक सेवा देणारी दुकाने यांना देखिल व्यवहार करतांना खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकांना 'सोशल डिस्टन्सिंग' पाळण्याबाबत आग्रह धरुन खरेदीसाठी येणारे नागरिक 'सोशल डिस्टन्सिंग' पाळतील याची स्वत: खबरदारी घ्यावी. 'सोशल डिस्टन्सिंग' चे पालन न करणाऱ्यांवर गडचिरोली पोलीस दलाकडून गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

'कोविड-१९' साथीच्या रोगाविरोधातील आजवरचा लढा गडचिरोली जिल्हावासियांनी प्रशासनाला उत्कृष्टपणे सहकार्य करून यशस्वी केला आहे. परंतु यापुढे देखील गाफील राहून चालणार नसून, यानंतर देखील अशाच प्रकारे नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी व्यक्त केला आहे.